सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २३५ | सोमवार, दि. १८ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



श्री. अतुल कुलकर्णी
टूर ऑपरेटर



श्री. दिलीप सोनवणे
अध्यक्ष : साने गुरुजी ग्रंथालय



श्री. निनाद जोशी
अमळनेर



श्री. सुधाकर कोठावदे
अमळनेर



श्री. अनिल महाजन (अबू)
नगरसेवक, अमळनेर

## 'ग्लोबल महातेज'ने ग्रामीण रुग्णालयाच्या दुर्दशेच्या पोस्टमार्टमची वेळीच दखल घेतली असती तर...

## ...आपल्या मतदारसंघाचे

# राज्यभर धिंडोळे नक्कीच निघाले नसते...!

**दै. 'ग्लोबल महातेज' जनसमस्या व लोकाभिमुख प्रश्नांबाबत नेहमीच सडेतोड व निष्पक्ष भूमिका घेत आहे. आम्ही ज्या-ज्या समस्यांना वाचा फोडतो आहे त्या-त्या समस्यांसंदर्भातील आम्ही प्रकाशित बातम्यांना संबंधित लोकप्रतिनिधी व यंत्रणेने सकारात्मकतेने त्यावर विचार करून तत्काळ उचित कार्यवाही करावी इतकीच आमची 'जागल्या' म्हणूनची माफक अपेक्षा असते. मात्र, आम्ही कोणत्याही समस्येला वाचा फोडली, की दै. ''ग्लोबल महातेज' एकतर्फी व आमच्या विरुद्ध आहे,'' आम्हाला बदनाम करतात,'' असा आमच्याबद्दल निष्कारण गैरसमज केला जातो. अर्थात अशा गैरसमजाची आम्ही कधीच चिंता करत नाही आणि करणारही नाही.**

आमच्या लोकाभिमुख, निष्पक्ष व निडर बातम्यांची जे लोकप्रतिनिधी व संबंधित यंत्रणा वेळीच दखल घेईल त्यांचे आणि परिणामी मतदारसंघातील लोकांचे निश्चितच भले होईल. जेव्हा आम्ही ग्रामीण रुग्णालयातील भयावह व कमालीशी धक्कादायक स्थिती छायाचित्रांसह प्रसिद्ध केली होती त्याबाबत एकाही लोकप्रतिनिधीने आमच्या बातम्यांची दखल घेतली नव्हती. ग्रामीण रुग्णालयाची दुर्दशा व रुग्णांचे हाल पाहण्यासाठी एकही जबाबदार लोकप्रतिनिधी, राजकीय पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी ग्रामीण रुग्णालयाला भेट देण्याची साधी तसदीही घेतली नव्हती. हे पाहून आम्ही आरोग्य विभागाच्या उच्चपदस्थांकडे तक्रारी केल्या. त्यानंतर कोठे थोडीशी यंत्रणा जागृत झाली. सिव्हिल सर्जन यांनी प्रत्यक्ष भेट देऊन सर्वांची कानउघाडणी केली होती. मात्र, ती तात्पुरती मलमट्टी ठरली. त्याच्याने ग्रामीण रुग्णालयाचे दीर्घकाळाचे दुखणे बरे झाले नाही. त्याच्यासाठी मोठ्या शस्त्रक्रियेचीच गरज होती. ती लोकप्रतिनिधींनीच करायला हवी होती. मात्र, त्यांनी न केल्याने शेवटी स्क्रीन मीडियाने अमळनेरच्या ग्रामीण रुग्णालयाचे अत्यंत भयावह चित्रण राज्यभरात दाखविले. त्यामुळे आमदार अनिलदादा पाटील यांनी ग्रामीण रुग्णालयाला भेट देऊन तेथील सर्व संबंधितांची चांगलीच कानउघाडणी केली. तेथील कारभार सुधारावा यासाठी त्यांना खडेबोल सुनावले. काही सक्त अल्टीमेटमही दिले. विधिमंडळ आणि 'डीपीडीसी'च्या माध्यमातून आता अनिलदादा स्वतः रुग्णालयाच्या काही ज्वलंत समस्या निश्चितच युद्धपातळीवर मार्गी लावतील. मात्र, हेच काम अनिलदादांनी दै. 'ग्लोबल महातेज'च्या वृत्तांची दखल घेऊन केले असते तर मतदारसंघाची बदनामी व अप्रतिष्ठा स्थानिक पातळीवरच राहिली असती. गेल्या काही महिन्यांपासून गरीब रुग्णांचे जे असह्य हाल होत आहेत ते झाले नसते. आजही आम्हास या गोष्टीचे शल्य आहे, की आम्ही ग्रामीण रुग्णालयाच्या केलेल्या वार्तांकनाला आम्ही आमदारांची आणि मतदारसंघाची बदनामी करत आहोत, अशी दुषणे काही सर्वत्र किडे पाडण्यासाठी आणि काड्या करण्यासाठी कुप्रसिद्ध असलेल्या विकृत मनोवृत्तीच्या लोकांनी सर्वत्र पसरविली होती. कदाचित आमदार साहेबांपर्यंतही असा चुकीचा मेसेज आमच्याबद्दल गेला असेल. त्यामुळेही कदाचित त्यांनी तेव्हा ग्रामीण रुग्णालयाच्या गैरप्रशासनाची दखल घेतली नसावी. याचे आम्हास आजही मनस्वी वाईट वाटत आहे.

आमदार अनिलदादा मतदारसंघाचा विकास करण्यासाठी महत्प्रयासाने जो निधी आणत आहेत त्यातून चांगली विकासकामे व्हावीत हाच त्यांचा

पान २ वर

## शिरीषदादा तुम्हीही आमच्या वृत्तांकनाकडे जरा लक्ष द्या...!

पालिकेत हल्ली शिवसेनेचे नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर व माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांना मानणाऱ्या शिवसेनेच्या व अन्य पक्ष आणि अपक्षांच्या नगरसेवकांची सत्ता आहे. मोठ्या अपेक्षेने अमळनेरकर जनतेने विद्यमान आमदारांच्या विरोधात जाऊन माजी आमदारांच्या हातात सत्ता सोपविली. शिरीषदादांना पुन्हा एकदा पालिकेसारख्या मोठ्या राजकीय पटलाच्या माध्यमातून 'टायगर अभी जिंदा है' हे सिद्ध करण्याची अमळनेरकरांनी मोठी सुसंधी दिली. असे करून चूक झाली की काय असे नागरिकांना आता वाटू लागले आहे. इतकेच नव्हे तर शिरीषदादांवर विश्वास ठेवून ज्या नगराध्यक्षांसह काही नगरसेवकांनी दादांचे नेतृत्व मान्य केले ते तरी सर्वच्या सर्व सुखी-समाधानी आहेत का? याचा शिरीषदादांनी शोध घेणे अत्यंत गरजेचे आहे. पालिकेच्या माध्यमातून जी कामे सुरू आहेत त्या कामांचाही दर्जा तपासणे, त्यांचा उचित तालतपास करणे अत्यावश्यक आहे. 'ग्लोबल महातेज'ने मागे आरोग्य विभागात एक्सपायरी डेटेड औषधांची फवारणी झाल्यासंदर्भात तसेच पालिकेच्या संदर्भातील अन्य काही ज्वलंत समस्यांच्या संदर्भात वृत्तांकन केले असता, "आम्ही पालिकेतील सत्ताधाऱ्यांची बदनामी करतो"



"एकतर्फी वृत्तपसिद्ध प्रसिद्ध करतो" अशी विनाकारणाची मनोधारणा पालिकेतील सत्ताधाऱ्यांनी केली. अर्थात याचे आम्हास मनस्वी वाईट वाटत असले तरीही आमच्याबद्दल कोणीही कितीही गैरसमज केला किंवा राग धरला तरी त्याबाबत आम्ही कालही चिंता केली नाही. आजही करत नाही आणि उद्याही करणार नाहीत.

पालिका निवडणुकीच्या काळात स्व. हिराकाकांच्या दुःखद निधनाचा शिरीषदादांवर

पान २ वर


दै. ग्लोबल महातेज च्या दि. २८ ऑक्टोबर २०२५ व १६, २७ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या ग्रामीण रुग्णालयाचे वृत्त

अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील स्वच्छताच कोमात...!

आरोग्य केंद्रातच रुग्णांच्या आरोग्याशी उघडपणे खेळ...!!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेरच्या ग्रामीण रुग्णालयातील घाणीची एकूणच स्थिती पाहता तेथील स्वच्छताच जणू कोमात गेली आहे. ग्रामीण रुग्णालय म्हणजे खऱ्या अर्थाने आरोग्य केंद्र आहे. मात्र, याच आरोग्य केंद्रात स्वच्छतेचे तीन- तेरा वाजल्याने रुग्णांच्या आरोग्याशीच जणू उघडपणे खेळ चालू असल्याचे दुर्दैवी चित्र आहे. तेथील स्थायी स्वरुपातील व मानसेवी डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षाचेच हे प्रतिक आहे.

रुग्णालयाची स्वच्छता व्यवस्था पार कोलमडली आहे. स्वच्छतागृहांची दयनीय अवस्था, तुटलेले बेड, कोरडेठाक पाण्याचे फिल्टर आणि सर्वत्र पसरलेली दुर्गंधी व घाण यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना रुग्णालयात थांबणे मुश्किल होत आहे.

रुग्णालयातील स्वच्छतागृहांची अवस्था पाहून अंगावर शहारे येतात. दुर्गंधी एवढी तीव्र आहे की, आत शिरणे म्हणजे शिक्षा भोगल्यासारखे वाटते. पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालय नाही, तर महिलांसाठी असलेलेही वापरण्यायोग्य नाहीत. पाण्याची सोय नसल्याने रुग्ण आणि नातेवाईक पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या विकत घेऊन स्वच्छतागृह वापरत आहेत. काहींना नाकातोंडाला रुमाल बांधून आत जावे लागत आहे. रुग्णालयातील जलशुद्धीकरण यंत्र देखील गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे रुग्णांना स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी जारवर अवलंबून राहावे लागते. मात्र, जार रिकामे झाल्यास रुग्णांना बाहेरून पाणी विकत आणावे लागते. हे दृश्य एखाद्या दुर्गम गावातले नव्हे, तर तालुक्याच्या प्रमुख रुग्णालयाचे आहे, हेच सर्वाधिक धक्कादायक आहे. रुग्णालयाच्या भिंतींवर गुटख्याच्या पिचकाऱ्यांचे थरवर थर आहेत. परिसरात साचलेले कचऱ्याचे ढिगारे आणि तुटलेले बेड हे सर्व पाहता रुग्णालय हे आरोग्य केंद्र नसून 'रोगालय' झाल्याची चर्चा रुग्णांच्या नातेवाईकांमधून होत आहे. काही वार्डातील गाद्या फाटलेल्या, जुजबी अवस्थेत असून, त्यावर झोपणे म्हणजे शिक्षाच होय. या परिस्थितीमुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. आर्थिक परिस्थितीअभावी खासगी रुग्णालयात अनेकांना उपचार घेणे शक्य होत नाही. त्यामुळे असे गरीब रुग्ण ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी येतात. मात्र, तेथे गेल्यावर जर अॅडमिट व्हावे लागले तर मात्र आपण उगीचच येथे आलो असे त्यांना वाटते. नाईलाजास्तव बरे होईपर्यंत सर्व प्रकारची सहनशक्ती वाढवून रुग्ण व त्यांचे नातेवाईक ग्रामीण रुग्णालयात थांबतात. उच्चपदस्थ अधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी एकदा का होईना, या रुग्णालयाला भेट द्यावी आणि रुग्णालयाची दुर्दशा पहावी, अशी मागणी अनेक नागरिकांनी केली आहे.

रंगीत बेडशीटस्च्या आदेशाला केराची टोपली..!

अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभार चव्हाट्यावर...!!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

रजनीकांत पाटील :

अमळनेर : संक्रमणजन्य आजारांचा धोका कमी करण्यासाठी राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये दररोज वेगवेगळ्या रंगांच्या, स्वच्छ व निर्जंतुक बेडशीट्स वापरण्याचे स्पष्ट निर्देश आरोग्य विभागाने दिले आहेत. मात्र, अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील या आदेशाला केराची टोपली

सध्या रुग्णालयात एकच रंगाच्या बेडशीट आहेत. वरिष्ठ पातळीवरून दुसरा पुरवठा अद्याप झालेला नाही. तर त्यातील काही निकामी बेडवरील बेडशीट धुण्यासाठी गेल्या असल्याने बेडवर नसतील. याबाबत कर्मचाऱ्यांना तातडीने कळवून व्यवस्था होईल.
- जी. एम. पाटील

मळका कापड अंथरलेले असल्याचे दिसते. विशेषतः शस्त्रक्रियेनंतरचे रुग्ण, महिला प्रसूती कक्ष तसेच बालरोग विभागात निष्काळजीपणा अधिक असल्याचे रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांचे म्हणणे आहे. यामुळे संसर्ग पसरण्याचा धोका वाढत असल्याची भीती व्यक्त होत आहे. रुग्णालयातील अपघात कक्षात कोणत्या दिवशी कोणत्या रंगाची बेडशीट वापरायची याबाबतचा चार्ट लावण्यात येतो. मात्र, ग्रामीण

कठल्या दिवशी

दै. ग्लोबल महातेजच्या बातमीचा दणका

अमळनेर ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभाराबाबत जिल्हा शल्य चिकित्सकांनी अधिकाऱ्यांना धरले धारेवर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : येथील ग्रामीण रुग्णालयातील भोंगळ कारभाराबाबत दै. ग्लोबल महातेजने मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर, शुक्रवार, दि. २१ नोव्हेंबर व मंगळवार, दि. १६ डिसेंबर रोजी ठळक बातम्या प्रसिद्ध करून वाचा फोडली होती. या बातम्यांची दखल घेऊन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. स्वप्निल सांगळे यांनी शुक्रवार, दि. २६ डिसेंबर रोजी दुपारी अचानक भेट

**जाहीर कळकळीची विनंती – सर्व पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शासकीय व निमशासकीय यंत्रणा यांना आमची हात जोडून कळकळीची विनंती आहे, की कोणत्याही प्रसिद्धीमाध्यमाने समस्यांना वाचा फोडल्यानंतर त्याची तत्काळ दखल घ्या. संबंधित माध्यमांवर आरोप करण्यापेक्षा स्वतःचे आत्मपरीक्षण करा. जे आपली चूक आणि त्रुटी दाखवितात त्यांना शत्रू न मानता आपला हितचिंतक माना. जेणेकरून भविष्यात आपल्या मतदारसंघातील सर्व लोकप्रतिनिधी, सर्व राजकीय प्रतिनिधी आणि एकूणच मतदारसंघाची प्रतिमा आणि प्रतिष्ठा अबाधित राहील. तूर्तास इतकेच...!**

## दिनविशेष
१८ मे

- वास्को-द-गामा भारतातील कालिकत बंदरावर आला.
- प्रभातचा 'संत ज्ञानेश्वर' हा चित्रपट एकाच दिवशी, मुंबई व पुणे या ठिकाणी प्रदर्शित झाला.
- दापोली येथे कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना झाली.
- पुण्यातील सुरेंद्र चव्हाण यांनी जगातील सर्वोच्च शिखर एव्हरेस्ट सर केले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदे शीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!**
**जय भारत...!**
**जय स्वदेशी...!!**






अमळनेर : राज्याचे संकटमोचक तथा जलसंपदा आणि लाभक्षेत्र विकास (तापी, विदर्भ आणि कोकण खोरे महामंडळे) मंत्री मा. ना. गिरीशभाऊ महाजन यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवार, दि. १७ मे रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास मंगळग्रह सेवा संस्था आणि भाजप तीर्थक्षेत्र विकास आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर भव्य 'मंगल जलसेवा' तसेच आरोग्यसेवा या उपक्रमांतर्गत भव्य रक्तदान शिबिराचे उद्घाटन करताना विविध मान्यवर.

( संबंधित वृत्त पान २ वर)

# मंगल जलसेवा, आरोग्यसेवा उपक्रमांचे उद्घाटन

## मंत्री गिरीशभाऊ महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळग्रह सेवा संस्था आणि भाजप तीर्थक्षेत्र विकास आघाडीतर्फे पैलाड परिसरात आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्याचे संकटमोचक तथा जलसंपदा आणि लाभक्षेत्र विकास (तापी, विदर्भ आणि कोकण खोरे महामंडळे) मंत्री मा. ना. गिरीशभाऊ महाजन यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवार, दि. १७ मे रोजी सकाळी साडेनऊच्या सुमारास मंगळग्रह सेवा संस्था आणि भाजप तीर्थक्षेत्र विकास आघाडी यांच्या संयुक्त विद्यमाने उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर भव्य 'मंगल जलसेवा' तसेच आरोग्यसेवा या उपक्रमांतर्गत भव्य रक्तदान शिबिराचे विविध मान्यवरांच्या शुभ हस्ते उद्घाटन झाले.

माजी नगराध्यक्ष सुभाष चौधरी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. माजी नगराध्यक्ष प्रभाकर नारायण पाटील, नगरसेवक विजय कहारू पाटील, भरत परदेशी, श्याम पाटील, भाजपच्या राज्य परिषद सदस्या सौ. भारतीताई सोनवणे, जिल्हा उपाध्यक्ष लालचंद सैनानी, बाळासाहेब पाटील, विधानसभा क्षेत्रप्रमुख शीतल देशमुख, तालुकाध्यक्ष भिकेश पाटील, शहराध्यक्ष योगेश महाजन, शहर चिटणीस देवाभाऊ लांडगे, माजी तालुकाध्यक्ष हिरालाल पाटील, माजी जि .प. सदस्य अ‍ॅड. व्ही. आर. पाटील, डॉ. अनिल शिंदे आदी मान्यवरांसह खान्देश शिक्षण मंडळाचे संचालक योगेश मुंदडे, रमेश धनगर, माजी सभापती शामबापू अहिरे, जळगाव जिल्हा किसान मोर्चा सरचिटणीस बापूराव महाजन, सुभाष पाटील, मच्छिंद्र लांडगे, दीपक भोई, दिलीप ठाकूर, मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर, खजिनदार गिरीश कुलकर्णी, मंगल सेवेकरी प्रकाश मेखा, बाळा पवार, मंगळग्रह मंदिराचे सेवेकरी योगेश पाटील, भूषण पाटील, राजेंद्र पाटील (भोळा टेलर), समीर सांगळे, उज्ज्वल अहिरराव आदींसह भारतीय जनता पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मंत्री मा. ना. गिरीशभाऊ महाजन यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कोणताही डामडौल न करता थेट जनतेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या मंगल जलसेवा अर्थात पाणपोई सुरू करण्यासह जनतेसाठी आरोग्यसेवा हा स्तुत्य उपक्रम सुरू केल्याबद्दल उपस्थितांनी मंगळग्रह सेवा संस्था तसेच भाजप तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे तोंडभरून कौतुक केले. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर या पाणपोईमुळे स्थानिक नागरिकांसह या परिसरातून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना तसेच वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मंगळग्रह सेवा संस्थेचे सहसचिव दिलीप बहिरम यांनी सूत्रसंचालन केले. विश्वस्त डी. ए. सोनवणे यांनी आभार मानले.




**मंत्री मा. ना. गिरीशभाऊ महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त दै. 'ग्लोबल महातेज'ने रविवार, दि. १७ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या राजकीय व सामाजिक प्रवासावर प्रकाश टाकणाऱ्या अभीष्टचिंतन विशेष पुरवणीचे प्रकाशन करताना विविध मान्यवर.** *(छायाचित्रे : मयूर चौधरी, नितेश बारी)*

### 'ग्लोबल महातेज'च्या विशेष पुरवणीचे प्रकाशन

**याचवेळी मंत्री मा. ना. गिरीशभाऊ महाजन यांच्या वाढदिवसानिमित्त दै. 'ग्लोबल महातेज'ने रविवार, दि. १७ मे २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या राजकीय व सामाजिक प्रवासावर प्रकाश टाकणाऱ्या अभीष्टचिंतन विशेष पुरवणीचे उपस्थित विविध मान्यवरांच्या शुभ हस्ते प्रकाशन करण्यात आले. या पुरवणीत मंत्री मा. ना. गिरीशभाऊ महाजन यांच्या लोकहितैषी कार्याचा गौरव करण्यात आलेला आहे.**

## संपादकीय

### परकीय चलन वाचवण्याचे आव्हान

जागतिक तेल संकट, सोन्याची आयात आणि परदेशातील भारतीय खर्चामुळे भारताला परकीय चलन वाचवण्याच्या आव्हानाचा सामना करावा लागत आहे. पंतप्रधान मोदींनी इंधन वाचवण्याचे, परदेश प्रवास कमी करण्याचे आणि सोने खरेदी टाळण्याचे आवाहन केले आहे. त्यांनी रस्ते अडवण्यावर आणि आयात केलेल्या वस्तूंना पर्याय शोधण्यावरही भर दिला.अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे अडीच महिने होर्मुझची सामुद्रधुनी बंद असल्याने निर्माण झालेले जागतिक गॅस आणि तेलाचे संकट अजूनही सुरू आहे. याचा परिणाम भारतासह संपूर्ण जगावर झाला आहे. भारताला होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मोठ्या प्रमाणात तेल आणि वायू मिळत असे. गेल्या अडीच महिन्यांत हा पुरवठा लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. तेल आणि वायू वाहून नेणारी काही जहाजे कशीबशी होर्मुझची सामुद्रधुनी ओलांडून भारतात परत येऊ शकत आहेत. भारताला अद्याप गंभीर पेट्रोलियम संकटाचा सामना करावा लागलेला नाही, ही वेगळी बाब आहे. जागतिक तेल आणि वायूच्या आव्हानाला प्रभावीपणे हाताळल्याबद्दल भारत सरकार कौतुकास पात्र आहे. होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यानंतर काही दिवसांतच अनेक देशांनी पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढवल्या असताना, भारताने मात्र सुमारे 75 दिवसांनंतर आणि इतर देशांपेक्षा खूपच कमी दराने दरवाढ केली. हे आवश्यक होते कारण तेल कंपन्यांना प्रचंड तोटा होत होता. जेव्हा जेव्हा कोणत्याही वस्तूची जागतिक पातळीवर कमतरता भासते, तेव्हा तिच्या किमती वाढतात. जर पश्चिम आशियातील संकट सुटले नाही, तर पेट्रोलियमच्या किमती आणखी वाढू शकतात, ज्यामुळे आयातीचा खर्च वाढेल. या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान मोदींनी अलीकडेच भारतीयांना पेट्रोल आणि डिझेलची बचत करण्याचे, परदेश प्रवास कमी करण्याचे, घरून काम करण्याचे आणि किमान एक वर्षासाठी सोने खरेदी न करण्याचे आवाहन केले आहे.

हे सर्वश्रुत आहे की सामान्य भारतीय सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोने खरेदीला प्राधान्य देतात. सध्या, जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा भारतीयांकडे सर्वाधिक प्रमाणात सोने आहे. एका अंदाजानुसार, भारतीय घरांमध्ये अंदाजे 40,000 टन सोने आहे. भारतात सोन्याचे उत्पादन खूप कमी होत असल्याने, त्याची आयात केली जाते. गेल्या वर्षी भारताने अंदाजे 72 अब्ज डॉलर किमतीचे सोने खरेदी केले. डॉलरच्या तुलनेत रुपया कमकुवत झाल्यामुळे सोन्याच्या आयातीसाठी मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च होत आहे. फार कमी भारतीय निधी मिळवण्यासाठी आपले सोने बँकांकडे गहाण ठेवतात, त्यामुळे ही एक निष्फळ गुंतवणूक ठरते. भारतीय सोने खरेदी करून ते घरी ठेवण्यास उत्सुक असण्याचे कारण म्हणजे बँकिंग प्रणाली आणि शेअर बाजारावरील त्यांचा अविश्वास असल्याचे मानले जाते. हे देखील नाकारता येत नाही की अनेक लोक आपली गैरमार्गाने मिळवलेली संपत्ती सोन्यात गुंतवतात. भारतीय जनतेचे सोन्याबद्दल असलेले विशेष आकर्षण पाहता, सरकारने बँकिंग प्रणाली आणि शेअर बाजारावरील या अविश्वासामागील कारणांवर लक्ष दिले पाहिजे. सर्वाधिक परकीय चलन पेट्रोलियम आयातीसाठी वापरले जाते. हे जलद आर्थिक वाढीमुळे आहे, परंतु वस्तुस्थिती अशी आहे की भारतातील वाहनांचे मायलेज कदाचित सर्वात कमी आहे. भारतीय वाहने प्रति लिटर पेट्रोल किंवा डिझेलमध्ये सर्वात कमी अंतर कापतात. हे आपल्या रस्त्यांच्या खराब पायाभूत सुविधा आणि सदोष रचनेमुळे आहे. रस्त्यांवरील अतिक्रमणामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे ही उर्वरित समस्या आणखी वाढते.टोल प्लाझावर अनेकदा वाहतूक कोंडी होते, ज्यामुळे लाखो लिटर पेट्रोलियम उत्पादनांची नासाडी होते. वाहतूक कोंडी किंवा वाहनांचा वेग कमी करणाऱ्या समस्यांवर उपाययोजना करता येत नाहीत असे नाही, परंतु त्यासाठी आवश्यक असलेल्या राजकीय आणि सामाजिक इच्छाशक्तीचा तीव्र अभाव आहे. मोठ्या शहरांची गोष्ट सोडाच, लहान शहरांमध्येही वाहतूक कोंडी होते, कधीकधी तर तासन्तास. तरीही, केंद्र सरकार, राज्य सरकारे किंवा त्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांना याची पर्वा असल्याचे दिसत नाही. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर, अनेक नेत्यांनी त्यांच्या वाहनांची संख्या कमी केली आहे किंवा ते मोटारसायकल किंवा मेट्रोने प्रवास करत आहेत. लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी अशी पावले उचलणे चांगले असले तरी, इंधनाच्या वापरात कोणतीही लक्षणीय घट केवळ वाहतूक कोंडीची समस्या सोडवल्यानेच होऊ शकते. अलीकडेच, रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले की, दिल्लीतील एमसीडीचे टोल प्लाझा पूर्णपणे इलेक्ट्रॉनिक केल्याने केवळ प्रदूषणच कमी होणार नाही, तर वाहतूक कोंडी दूर होऊन इंधनाचीही बचत होईल.दिल्लीप्रमाणेच, देशभरातील इतर शहरांमध्येही असंख्य टोल प्लाझा आणि वाहतूक अडवणारे अडथळे आहेत, ज्यामुळे इंधनावर अब्जावधी रुपयांची नासाडी होते. सरकारी विभागांनी हे समजून घेतले पाहिजे की वाहतूक कोंडी कमी करून इंधनावर अब्जावधी रुपयांची बचत करता येते. यामुळे परकीय चलनही वाचेल. आपल्या देशात रस्त्यांवरील अतिक्रमण ही एक सामान्य बाब असल्याने, त्यामुळे वाहतूक कोंडी होते आणि वाहतूक कोंडी झाल्यावर इंधन वाया जाते. रस्त्यांवरील अतिक्रमण ही येथे एक सामाजिक समस्या बनली आहे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी राजकीय आणि प्रशासकीय इच्छाशक्तीचा अभाव आहे. आपली नोकरशाही या समस्येवर दीर्घकालीन उपायांचा क्वचितच गांभीर्याने विचार करते.

भारताची लोकसंख्या मोठी आहे आणि तिची आर्थिक समृद्धी अनेक युरोपीय देशांच्या तुलनेत आहे. आज, ही श्रीमंत लोकसंख्या काटकसर करेल अशी शक्यता कमी आहे. सरकारने या घटकाला परकीय चलन वाचविण्यात मदत करू शकतील असे पर्याय कसे तयार करता येतील याचा विचार करणे अधिक चांगले होईल. तरच ते अनावश्यक खर्चाचा आरोप टाळू शकतील. अनेक भारतीय पर्यटन किंवा खरेदीसाठी परदेशात प्रवास करतात. यामुळे मोठ्या प्रमाणात परकीय चलन खर्च होते. याशिवाय, देश मोठ्या प्रमाणात इलेक्ट्रॉनिक्स आणि इतर आयात केलेल्या वस्तूंची खरेदी देखील करतो.याचे कारण असे आहे की, भारतीयांना आवश्यक असलेल्या अनेक वस्तू देशात तयार होत नाहीत किंवा त्या निकृष्ट दर्जाच्या असतात. जोपर्यंत आयात केलेल्या वस्तूंना चांगले पर्याय उपलब्ध होत नाहीत, तोपर्यंत उच्चभ्रू वर्ग परकीय चलन खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी सहकार्य करू शकणार नाही. तात्काळ कारवाई करणे अशक्य असल्याने, सरकारने आता दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, जेणेकरून भविष्यात उच्चभ्रू भारतीयांना पर्यटन, खरेदी आणि लग्नसमारंभांसाठी परदेशात जाण्याची गरज भासणार नाही.

# पी.बी.ए. इंग्लिश मीडियम स्कूलचे सुवर्णयश

## मुख्याध्यापक जे. एस. देवरे यांना 'बेस्ट प्रिन्सिपल' पुरस्कार; तर 'रोबो क्वेस्ट' स्पर्धेत विद्यार्थ्यांची 'इस्रो' भेटीसाठी निवड!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : येथील नामांकित पी.बी.ए. इंग्लिश मिडीयम स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. डॉक्टर होमी भाभा रिसर्च सेंटर, मुंबई यांच्या वतीने शाळेचे मुख्याध्यापक जे. एस. देवरे यांना 'बेस्ट प्रिन्सिपल' (उत्कृष्ट प्राचार्य) पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे.

या दुहेरी आनंदाच्या सोहळ्यात भर घालत शाळेच्या विद्यार्थ्यांनीही राज्यस्तरावर आपल्या बुद्धिमत्तेचा डंका वाजवला आहे. 'रोबो क्वेस्ट प्रतियोगिता' या राज्यस्तरीय स्पर्धेत शाळेचे विद्यार्थी कार्तिक शिसोदे आणि कौस्तुभ शिसोदे यांनी घवघवीत यश संपादन केले असून, त्यांची थेट 'इस्रो' भेटीसाठी निवड करण्यात आली आहे.मुख्याध्यापक जे. एस. देवरे यांच्या कुशल नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक आणि तंत्रज्ञान क्षेत्रात नेहमीच आघाडी घेतली आहे. त्यांच्या याच योगदानाची दखल घेत मुंबईच्या नामांकित होमी भाभा रिसर्च सेंटरने त्यांना गौरविले.दुसरीकडे, रोबो क्वेस्ट स्पर्धेत कार्तिक आणि कौस्तुभ यांनी दाखवलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांना भारतातील सर्वोच्च अंतराळ संशोधन संस्था 'इस्रो' ला भेट देण्याची सुवर्णसंधी मिळाली आहे. या यशामुळे संपूर्ण परिसरातून विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.या उत्तुंग यशामागे शाळेचे चेअरमन डॉ. संदेश गुजराथी यांचे भक्कम पाठबळ लाभले. तसेच मुख्याध्यापक जे. एस. देवरे, पर्यवेक्षक महेश माळी, पर्यवेक्षिका मीनाक्षी बारी, व्ही. एस. अमृतकर, स्वाती माळी, डिंपल देसाई, प्रशांत वंजारी, योगिता पाटील आणि सविता पवार या सर्व शिक्षक वृंदाचे विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### राज्यभर धिंडोळे नक्कीच निघाले नसते...!

**पान १ वरून :** सद्हेतू आहे. मात्र, काही ठेकेदार अत्यंत निकृष्ट कामे करीत आहेत. त्यामुळे आमदार साहेब आणि मतदारसंघ दोघांचीही अप्रतिष्ठा होते आहे. याबाबत जनमानसाच्या अंतर्मनात खदखदणारा राग व असंतोष यास आम्ही वेळोवेळी वाचा फोडण्याचे वृत्तांकन करत असतो. विधानसभा निवडणुकीत अनिलदादांना शहरातून फक्त एक हजाराचे मताधिक्य मिळणे, पालिका निवडणुकीत विरोधकांना सत्ता मिळणे हे मतदारसंघातील सार्वजनिक व सार्वत्रिक असंतोषाचेच द्योतक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. आमच्या वृत्तांकनाची वेळीच दखल घेऊन कामे दर्जेदार कशी होतील याची काळजी घेणे गरजेचे आहे. आमदार साहेब कधीही कोणत्याही ठेकेदाराला असे सांगत नसतील की तुम्ही निकृष्ट कामे करा. मात्र, ज्या ठेकेदारांना आमदार अनिलदादा विश्वासाने कामे देतात ते त्यांचा आणि मतदारसंघाचा त्याचप्रमाणे लोकांच्या कष्टाच्या पैशांचा किती मोठा विश्वासघात करीत आहेत याकडे देखील वेळोवेळी सजगतेने पाहणे गरजेचे आहे. निकृष्ट कामांमुळे जनतेच्या मनात खदखदणारा असंतोष आणि राग जाणून घेणे अत्यावश्यक आहे. अन्यथा आगामी काळात पुन्हा कोणीतरी राज्य किंवा राष्ट्रस्तरावरचा स्क्रीन मीडियाचा पत्रकार येईल आणि निकृष्ट कामांचे वृत्तांकन करून लोकप्रतिनिधी आणि मतदारसंघाचे वाभाडे राज्यभर काढेल.

### शिरीषदादा तुम्हीही आमच्या वृत्तांकनाकडे जरा लक्ष द्या...!

**पान १ वरून :** मोठा आघात झाला होता. त्या पार्श्वभूमीवर शिरीषदादांनी जाहीर प्रचारसभेत त्यांना पोरके न करण्याच्या भावनिक आवाहनाला अमळनेरकर जनतेने तितकाच भावनिक प्रतिसाद देऊन पालिकेची सत्ता सोपविली. या भावनिक उपकारांची परतफेड म्हणून का होईना शिरीषदादा आता तुम्ही अमळनेरकर जनतेला पोरके करू नका. पालिका निवडणुकीत स्व. हिराकाकांच्या दुःखद निधनामुळे तुम्हाला प्रत्येक प्रभाग, गल्ली, मोहल्ल्यात प्रचार करायला पुरेसा वेळ मिळाला नाही. आता तरी सर्वत्र फिरा. नागरिकांच्या समस्या जाणून घ्या.

शिरीषदादा, पालिकेतून कित्येक कोटी रुपयांची बिले आर्थिक वर्षाखेरीस नुकतीच अदा झाली आहेत. आम्हास हे पूर्ण मान्य आहे की त्यातून आपण एक रुपयाही कमिशन घेतलेले नाही. इतकेच नव्हे तर बिले काढण्यासाठी "कमिशन वसुली, सेटलमेंट आणि जुगाड समितीची "आपण स्थापनाही केलेली नाही. अशी कोणतीही एक सदस्यीय किंवा बहुसदस्यीय समिती तथा नगरसेवक पालिकेत कार्यरत नाही याची देखील आम्हास खात्री आहे. मात्र तरी देखील पालिकेतून कोणा-कोणाची आणि कशी-कशी बिले का अदा झाली याविषयी जनमानसातच नव्हे; तर खुद्द नगराध्यक्षांसह सत्ताधारी गटात काय चर्चा आहे? हे जरा आपण लक्ष आणि कान देऊन ऐकण्याची गरज आहे. अन्यथा पालिकेच्या निवडणुकीत ज्या जनतेने आपल्याला डोक्यावर घेतले तीच जनता उद्या तुमच्या कार्यकर्तृत्वाची (?) योग्य ती पावती दिल्याशिवाय राहणार नाही.

# औषध विक्रेत्यांचा २० मे रोजी बंद

## नागरिकांना अत्यावश्यक औषधांची आगाऊ व्यवस्था करण्याचे अन्न व औषध प्रशासनातर्फे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : आखिल भारतीय औषधी विक्रेता संघटनेने देशात व राज्यात संपुर्ण भारतभर औषध विक्रेत्यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांच्या संदर्भात दि. २० मे २०२६, रोजी देशातील सर्व ठोक व किरकोळ औषध विक्रीचे व्यवहार बंद ठेवण्याचे आवाहन केले आहे.

त्यामुळे शहरातील जिल्ह्यातील अनेक औषध दुकाने बंद राहण्याची शक्यता आहे. नागरिकांनी अत्यावश्यक औषधे व वैद्यकीय साहित्य यांची आगाऊ व्यवस्था करून घ्यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, आपत्कालीन सेवा, शासकीय रुग्णालये तसेच काही निवडक औषध दुकाने सुरू राहण्याची शक्यता आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी औषध प्रशासन व पोलीस विभागाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत.

या पार्श्वभुमीवर, सहायक आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, जळगाव यांनी केमिस्ट बांधवांना आवाहन केले आहे की, या बंदमध्ये सहभागी होऊ नये. औषधे ही अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत येत असल्याने रुग्णांना औषधांचा पुरवठा न करणे हे कायद्याचे उल्लंघन ठरू शकते, अशा सूचनाही त्यांना देण्यात आल्या आहेत. तसेच औषध किंमत नियंत्रण आदेश २०१३ व औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० अंतर्गत नियमांचे पालन करणे बंधनकारक असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

रुग्णांना औषधांच्या अभावामुळे कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी संघटनांनी योग्य खबरदारी घ्यावी, असे प्रशासनाने नमूद केले आहे. तसेच आपत्कालीन परिस्थितीत औषधे उपलब्ध न झाल्यास सहायक आयुक्त (औषधे) डॉ. प्र.भा. अस्वार मो. ९४२२३५६१४३ व श्रीमती क. र. पाटील मो. ९८६०१७२५६१ यांच्याशी संपर्क साधावा व नागरिकांनी शांतता व संयम राखून औषध प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

आभार

आशिर्वाद रुपी शुभेच्छांचा वर्षाव

प्रिय... मित्र, नातेवाईक व सहकारी सस्नेह नमस्कार, आपण सर्वांनी माझ्या जन्म दिनाच्या आठवणीने भेटून, फोनद्वारे सद्कामना दिल्यात, तुम्ही सर्वजण जगण्यातील आनंदाचं बळ आहात, हे मला मिळत राहील...
या इच्छेसह स्नेह ऋणी आहे. ..



आपला स्नेही
श्री. रामदास निकुंभ (नाना)
प्रसिद्ध बिल्डर व डेव्हलपर,
अमळनेर

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com






# दूरदर्शन ने रिजेक्ट किया पहला शो, बाद में बनीं बॉलीवुड सुपरस्टार

## शादी के बाद ८ साल का ब्रेक, आज भी फैंस का इनके लिए धड़कता है दिल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तीन साल की उम्र से डांस करने लगी थीं ये ९० के दशक की सुपरस्टार, बतौर कथक नृत्यांगना नौवें साल में स्कॉलरशिप मिली थी। सिने लवर्स जब भी 'धक धक गर्ल' का जिक्र करते हैं तो वो मुस्कान और अनोखे नृत्य की मल्लिका माधुरी दीक्षित का चेहरा आंखों के सामने आ जाता है। दर्शकों को एक से बढ़कर एक फिल्में देने वाली अभिनेत्री न केवल अभिनय व खूबसूरती बल्कि डांसिंग में भी कमाल हैं। हालांकि, कम ही लोग जानते हैं कि वह ३ साल की उम्र से ठुमकने लगी थीं और नौवें साल में उन्हें पहली बार स्कॉलरशिप भी मिला था। १५ मई १९६७ को मुंबई में जन्मीं माधुरी ने बहुत जल्दी कथक नृत्य में अपनी प्रतिभा दिखानी शुरू कर दी। बचपन से ही नृत्य के प्रति जुनून रखने वाली माधुरी दीक्षित आज भी अपनी अदाकारी और नृत्य से दर्शकों के दिलों पर राज करती हैं।



**पहला शो हुआ रिजेक्ट**

स्कूल में पढ़ाई के साथ-साथ वह कल्चरल एक्टिविटीज में बढ़-चढ़कर हिस्सा लेती थीं। स्कूली शिक्षा पूरी करने के बाद उन्होंने माइक्रोबायोलॉजिस्ट बनने के लिए कॉलेज जॉइन किया, लेकिन किस्मत को कुछ और ही मंजूर था। उनकी किस्मत का रास्ता अभिनय की ओर मुड़ गया। १९८४ में उन्हें पहला शो मिला। लेकिन वह दूरदर्शन ने इम्प्रेसिव कास्ट ना होने के चलते रिजेक्ट कर दिया. इसके बाद साल १९८४ में राजश्री प्रोडक्शंस की फिल्म 'अबोध' से उन्होंने बॉलीवुड में डेब्यू किया। फिल्म को खास सफलता नहीं मिली, लेकिन माधुरी को पहली ही फिल्म के लिए आलोचकों की सराहना मिली। १९८५ में माधुरी दीक्षित दूरदर्शन के पेइंग गेस्ट शो में बतौर गेस्ट नजर आईं। इसके बाद वह 'आवारा बाप', 'स्वाती', 'हिफाजत' और 'उत्तर दक्षिण' जैसी फिल्मों में नजर आईं। साल १९८८ में आई फिल्म 'तेजाब' ने उनके करियर को नई दिशा दी। फिल्म में 'मोहिनी' गाने पर उनका नृत्य रातोंरात सुपरहिट हो गया और माधुरी दीक्षित स्टार बन गईं।

**९०s की बनीं टॉप एक्ट्रेस**

एक समय ऐसा भी आया कि ९० के दशक में माधुरी दीक्षित बॉलीवुड की सबसे बड़ी स्टार मानी जाती थीं। फिल्म 'दिल' के लिए उन्हें पहला फिल्मफेयर बेस्ट एक्ट्रेस अवॉर्ड मिला। इसके बाद 'बेटा', 'हम आपके हैं कौन' और 'दिल तो पागल है' जैसी फिल्मों ने उन्हें चार फिल्मफेयर अवॉर्ड दिलाए। 'खलनायक', 'अंजाम', 'मृत्युदंड' और 'साजन' जैसी फिल्मों में उन्होंने शानदार अभिनय किया।

**शादी के बाद लिया ८ साल का ब्रेक**

साल १९९९ में माधुरी दीक्षित ने डॉ. श्रीराम माधव नेने से शादी कर ली। इसके बाद वह अमेरिका चली गईं, लेकिन साल २००७ में 'आजा नचले' से वापसी की। २००२ में 'देवदास' में चंद्रमुखी का रोल उनके करियर की बेहतरीन भूमिकाओं में शुमार है, जिसके लिए उन्हें फिल्मफेयर बेस्ट सपोर्टिंग एक्ट्रेस अवॉर्ड मिला। उन्होंने २०१४ में 'डेढ़ इश्किया' और 'गुलाब गैंग' जैसी फिल्मों में सशक्त भूमिकाएं निभाईं। २०१८ में मराठी फिल्म 'बकेट लिस्ट' और २०१९ में 'कलंक' व 'टोटल धमाल' जैसी फिल्मों में भी उन्होंने अपनी उपस्थिति दर्ज कराई। माधुरी दीक्षित की एक्टिंग व डांस का जादू आज भी बरकरार है। वह रियलिटी शोज में बतौर जज भी कई बार नजर आ चुकी हैं। इसके अलावा, अपनी प्रोडक्शन कंपनी के कामों में व्यस्त रहती हैं।

# पहिल्याच प्रयत्नात 'यूपीएससी'त यश

## सोहम शेंडे यांची आयएफएस अधिकारीपदी निवड; ग्रामीण भागातील युवकाची प्रेरणादायी यशोगाथा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सक्सेस स्टोरी

जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकांचा मुलगा केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेतलेल्या परीक्षेत उत्तीर्ण होऊन प्रथमवर्ग अधिकारी झाला. भाडळी बुद्रुक (ता. फलटण) येथील निवृत्त वरिष्ठ मुख्याध्यापक नामदेव शेंडे यांचा मुलगा सोहम यांची नुकतीच केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या यूपीएससी परीक्षेच्या निकालामध्ये देशामध्ये (आयएफएस रँक -७५) मिळवून वन विभागात प्रथमवर्ग अधिकारी म्हणून निवड झाली आहे.

सोहम यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद केंद्र शाळा (राजुरी), माध्यमिक शिक्षण मुधोजी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज (फलटण) येथे, तर पदवीचे शिक्षण वालचंद कॉलेज (सांगली) येथून झाले आहे.

गेल्या दोन वर्षांपासून ते दिल्लीत यूपीएससीच्या परीक्षेची तयारी करत होते. विशेष म्हणजे पहिल्याच प्रयत्नामध्ये त्यांनी हे यश मिळवले आहे. ग्रामीण भागातील तरुणांना एक नवा आदर्श घालून दिला आहे. या यशाबद्दल त्यांचे विविध क्षेत्रांतून अभिनंदन होत आहे.

# जीन्स घातली म्हणून सासू ओरडली आणि २२ वर्षांच्या गौरीने संपवले आयुष्य

## माहेरच्यांनी लावले सासरच्या लोकांवर धक्कादायक आरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजच्या आधुनिक युगात आपण 'स्त्री-पुरुष समानता' आणि 'स्वातंत्र्या'च्या मोठ्या गप्पा मारतो. पण आजही अनेक घरांच्या उंबरठ्याआत कपड्यांच्या निवडीवरून किंवा छोट्या-मोठ्या कौटुंबिक वादातून स्त्रियांचे मानसिक खच्चीकरण केले जाते. घरामध्ये नेमके काय परिधान करावे, यावरून होणारी टोकाची टीका एखाद्या व्यक्तीला आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्यास कशी प्रवृत्त करू शकते, याचीच एक सुन्न करणारी घटना इंदूरच्या द्वारकापुरी परिसरातून समोर आली आहे.



**नेमकी घटना काय?**

इंदूरमध्ये राहणाऱ्या २२ वर्षीय गौरीने सोमवारी राहत्या घरी गळफास लावून आपले आयुष्य संपवले. मिळालेल्या माहितीनुसार ११ मे रोजी गौरीने सासरच्या घरी पहिल्यांदाच जीन्स घातली होती. ही गोष्ट तिची सासू शारदा यांना आवडली नाही आणि त्यांनी गौरीला यावरून कडक शब्दांत सुनावले. सासूच्या बोलण्यामुळे दुखावलेली गौरी रागात आपल्या खोलीत गेली आणि तिने आतून दरवाजा लावून घेतला.

ही घटना घडली तेव्हा दुपारची वेळ होती. गौरीचा पती राहुल हॉलमध्ये बसून मोबाईल बघत होता, तर त्यांची चिमुकली मुलगी हॉलमध्ये खेळत होती. थोड्या वेळाने मुलगी रडायला लागली, तेव्हा राहुलने गौरीला हाक मारली. पण खोलीतून कोणताही प्रतिसाद आला नाही. राहुलने खोलीत जाऊन पाहिले असता गौरी पंख्याला लटकलेल्या अवस्थेत आढळली.

# उन्हाळ्यात मडक्यातील पाणी पिताय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उन्हाळ्यात थंड पाण्यासाठी वापरा मातीचे मडके उन्हाळ्यात मातीच्या भांड्यातील पाणी पिणे आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. हे मातीचे भांडे कसे वापरायचे? त्याला धुण्याची योग्य पद्धत काय आहे? हे सविस्तर जाणून घ्या.

**मीठाच्या पाण्याची प्रक्रिया**

नवीन मातीचे भांडे वापरण्यापूर्वी १२-२४ तास मीठाच्या पाण्याने भरून ठेवा. यामुळे मातीचा वास कमी होतो आणि पाणी थंड राहते.

**सावलीत भांडे ठेवा**

भांडे नेहमी थेट सूर्यप्रकाशापासून दूर आणि हवेशीर ठिकाणी ठेवा. त्यामुळे बाष्पीभवन चांगले होऊन पाणी नैसर्गिकरित्या थंड राहते.

**झाकण वापरणे गरजेचे**

भांड्यावर झाकण किंवा ओला कपडा ठेवल्याने धूळ आत जात नाही आणि पाण्याचा थंडपणा जास्त वेळ टिकून राहतो.



**२ ते ३ तासांत पाणी थंड**

भांडे भरल्यानंतर लगेच पाणी पिऊ नका. दोन-तीन तासांनी पाणी अधिक थंड होते आणि मातीचा नैसर्गिक सुगंध मिळतो.

**साबण टाळा**

मातीचे भांडे स्वच्छ करताना साबण किंवा कडक घासणी वापरू नका. त्यामुळे भांड्याची सूक्ष्म छिद्रे बंद होण्याची शक्यता असते.

**गरम पाणी टाळा**

मातीच्या भांड्यात खूप गरम पाणी टाकू नका. त्यामुळे भांड्याला तडे जाऊ शकतात किंवा ते गळण्याची शक्यता वाढते.

**केमिकल कोटिंग भांडी टाळा**

जास्त रंग किंवा केमिकल कोटिंग असलेली भांडी वापरणे टाळा. अशी भांडी पाणी योग्यरित्या थंड ठेवू शकत नाहीत.

# माळी समाजाचा काय आहे इतिहास?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

माळी समाजाचा इतिहास हा भारतातील प्राचीन कृषी व बागायती परंपरेशी संबंधित मानला जातो. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि गुजरात या भागांत माळी समाज मोठ्या प्रमाणात आढळतो. 'माळी' हा शब्द प्रामुख्याने फुले, बागा, मळे आणि शेती यांच्याशी संबंधित व्यवसायावरून उदयास आल्याचे मानले जाते. त्यामुळे ऐतिहासिकदृष्ट्या हा समाज बागकाम, फुलशेती, भाजीपाला उत्पादन आणि कृषी व्यवसायाशी जोडलेला होता.

काही समाजपरंपरांनुसार माळी समाजाचे मूळ राजस्थान व माळवा प्रदेशात असल्याचे सांगितले जाते. 'माळवा' या प्रदेशावरून 'माळी' हे नाव



पडले, असा एक लोकसमज आढळतो. राजस्थान, मध्य प्रदेश आणि उत्तर भारतात आजही सैनी, कुशवाह, मरार, मौर्य, शाक्य, जिरेमाळी, फुलमाळी अशा विविध उपशाखा आढळतात. महाराष्ट्रात फुलमाळी, जिरेमाळी, हळदीमाळी, आगरी माळी, पंचकळशी इत्यादी पोटजातींचा उल्लेख दिसतो. काही समाजग्रंथ व परंपरांमध्ये माळी समाजाला 'क्षत्रिय' किंवा 'राजपूत वंशाशी संबंधित' मानले जाते. विशेषतः सैनी, कुशवाह किंवा क्षत्रिय माळी समाजामध्ये अशा परंपरा सांगितल्या जातात. परंतु मुख्य प्रवाहातील इतिहासकारांकडे याबाबत ठोस आणि सर्वमान्य ऐतिहासिक पुरावे उपलब्ध नाहीत. त्यामुळे हे दावे समाजपरंपरा व वंशकथांच्या स्वरूपातच पाहिले जातात. तसेच 'मुस्लिम आक्रमणांनंतर राजपूत समाजातील काही गट शेतीकडे वळले आणि त्यांना माळी म्हणू लागले' अशीही एक परंपरागत कथा सांगितली जाते; मात्र यालाही ठोस ऐतिहासिक आधार मिळत नाही. त्यामुळे हा दावा निश्चित इतिहास म्हणून स्वीकारला जात नाही.

उत्तर भारतातील कुशवाह समाज स्वतःला भगवान श्रीरामांचे पुत्र कुश यांचे वंशज मानतो. हा दावा धार्मिक व पारंपरिक वंशपरंपरेवर आधारित आहे; त्याचे प्रत्यक्ष ऐतिहासिक पुरावे उपलब्ध नाहीत. एकूण पाहता माळी समाज हा भारतातील प्राचीन कृषी-बागायती परंपरेशी निगडित मोठा समाज असून त्याने शेती, फुलशेती, समाजसुधारणा आणि शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. महात्मा जोतिराव फुले यांसारख्या महान समाजसुधारकांनी याच समाजातून उदय घेत भारतीय समाजजीवनावर अमिट प्रभाव निर्माण केला.










# कायिक, वाचिक आणि मानसिक पापे नष्ट करण्याची सुवर्णसंधी

## गंगादशहरारंभ आणि अधिकमास विशेष...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सन २०१८ नंतर पुन्हा एकदा अधिकमास हा ज्येष्ठ महिन्याच्या ठिकाणी आलेला आहे. त्यामुळे यास अधिक ज्येष्ठमास असे म्हटले जाते. त्यातही अजून विशेष म्हणजे गंगादशहरारंभसुद्धा यासोबतच १७ मे २०२६ पासून सुरू झाला आहे. तो १५ जून २०२६ पर्यंत आहे. जेव्हा सूर्य हा वृषभ राशीत असतो तेव्हा गंगादशहरारंभ असतो. यंदा अधिक मास लागण्यापूर्वीच सूर्याचे वृषभ राशीत संक्रमण झालेले आहे. निज ज्येष्ठ महिना सुरू होतो तेव्हा सूर्य मिथुन राशीत असेल. त्यामुळे गंगादशहरा अधिक ज्येष्ठ महिन्यातच करावा लागत आहे. गंगादशहरारंभ दि. १७ मे रोजी सुरू होऊन समाप्ती २५ मे २०२६ पर्यंत असेल. गंगादशहरा आणि अधिकमास एकत्र आल्याने भाविकांना दुहेरी पर्वकाळाचा लाभ मिळणार आहे. या काळात गंगापूजनाने दहा प्रकारची पापे नष्ट होतात. ज्यात तीन कायिक, तीन मानसिक आणि चार वाचिक अशा पापांचा समावेश होतो. हा दशहरा प्रथम आपल्या कुलदेवतेला, त्यानंतर आपल्या गुरूंना, त्यानंतर कुलगुरू, ब्राह्मण यांना देण्यात येतो.



### अधिक मास का येतो?

पृथ्वीवरील कालगणना ही सूर्य आणि चंद्र यांच्या गतीवरून केली जाते. सूर्य गतीवरून केल्या जाणाऱ्या कालगणना सौरवर्ष तर चंद्रांच्या गतीवरून केल्या जाणाऱ्या गणनेला चांद्रवर्ष असे म्हणतात. या दोन्ही कालगणनांमध्ये दरवर्षी दहा-अकरा दिवसांचा फरक पडतो. आता हा प्रत्येक वर्षी पडणारा दहा-अकरा दिवसांचा फरक भरून काढण्यासाठी शास्त्रकारांनी दर तीन वर्षांनी एका जास्त मासाची योजना केली आहे, यालाच अधिकमास असे म्हणतात. सूर्य हा प्रत्येक महिन्यात, प्रत्येक राशीत म्हणजे बारा महिन्यांत बारा राशींतून संक्रमण करीत असतो. सूर्याप्रमाणे चंद्र सुद्धा प्रत्येक महिन्यात २७ नक्षत्रे भोगत असतो. मात्र चंद्र-सूर्याच्या कालगणनेतील हा दहा-अकरा दिवसांचा दरवर्षी होणारा फरक भरून काढण्यासाठी अधिकमास येतो. त्यात मात्र सूर्य संक्रमण होत नाही. सूर्य संक्रांत नसलेल्या त्या चांद्रमासात म्हणजेच अधिकमासात वातावरण हे गढूळ, मलीन असते. या त्याच्या मलिनतेवरूनच त्याला 'मलमास' असेही म्हणतात.

शास्त्रकारांनी हा मलमास सर्व मंगलकार्यासाठी जरी निषिद्ध मानलेला असला, तरी सुद्धा या अधिकमासात स्नान, दान, पूजा, जप इत्यादी जी धर्मकृत्य केली जातात त्याचे फळ मात्र उपासकाला अधिक प्रमाणात नक्कीच मिळते. अधिक महिन्यात केलेल्या तीर्थयात्रा, पवित्र क्षेत्रातील पुण्यपावन नद्यांची स्नान, केलेली विविध दान, जप आणि पूजन यांचे फल अधिक, कारण या मलमासाचा प्रत्यक्ष श्रीकृष्णानेच स्वीकार केलेला आहे आणि त्या मासाला पुरुषोत्तम मास हे नावही बहाल केले आहे. तसेच या अधिक महिन्यात अर्थात पुरुषोत्तम मासात केलेल्या धर्माचरणाला अधिक फलप्राप्तीचे वरदानही दिले आहे. त्यामुळेच या अधिकमासाचे महत्त्व आणि महात्म्य हे पण फार थोर आहे.

या मलमासात लग्नकार्यादिक मंगलकार्य केली जात नाहीत. हा मास जेव्हा निर्माण झाला तेव्हा सर्व लोकांनी या मलमासाला त्याज आणि निषिद्ध मानले. त्यामुळे तो मलमास मोठा दुःखी, कष्टी आणि व्यथित झाला, तो भगवंतांना शरण आला. भगवंत त्याला घेऊन भगवान श्रीकृष्ण यांच्याकडे गेले. मलमासाने आपली जन्मकथा आणि व्यथा श्रीकृष्णांना सांगितली. तेव्हा त्या दयावंत भगवान पुरुषोत्तमाने त्या मलमासाचा स्वीकार केला आणि त्याला आपलेच म्हणजे 'पुरुषोत्तम मास' असे नाव दिले. त्याचप्रमाणे जो कोणी मनुष्यप्राणी या अधिक मासात पूजाअर्चा, देवधर्म, दान, स्नान, जप-तप तीर्थाटन इत्यादी कर्म करतील, त्यांना 'अधिकस्य अधिकं फलम्' या न्यायाने जास्तीत जास्त चांगले फल, सुख, सौख्य आणि समाधान व शेवटी भगवत कृपा प्राप्त होईल, असा मंगल आशीर्वाद दिला.

या महिन्यात दानाला फार मोठे महत्त्व आहे. मग ते दान हे अन्न, वस्त्र किंवा धनाच असेल, गोदान, दीपदान असेल किंवा ब्राह्मण व विष्णू स्वरूप जामाताला अर्थात जावयाला दिलेले अपूप दान असेल. दान हे कोणतेही आणि कुणालाही दिलेले असले तरी ते सत्पात्री असणे आवश्यक आहे. सत्पात्र ब्राह्मणाला दिलेले दान हे प्रत्यक्ष भगवंताच्या चरणी अर्पण केल्याचे पुण्य लाभते. अशा दानधर्मान भगवंत संतुष्ट होतो. या अधिक महिन्यात सदाचारी, निष्ठावान, परोपकारी आणि पुण्यवान असे साधू, संत, सत्पुरुष, गुरू, ब्राह्मण, पतिव्रता इत्यादींना बोलावून त्यांचे पूजन करावे, त्यांना आवश्यक अशा वस्तू, वस्त्र आणि मिष्टान्न भोजन द्यावे, दान दक्षिणा देऊन त्यांना संतुष्ट करावे आणि त्यांचे मंगल आशीर्वाद घ्यावेत. अशाने घरात धनधान्याची समृद्धी होते. सुख, शांती, समाधान आणि आनंद लाभतो. या ब्राह्मण किंवा श्रेष्ठांच्या पूजना इतकेच या महिन्यातील गोपूजेचे आणि गोदानाचेही फार मोठे महत्त्व आहे. या अधिकमासात नक्तभोजन करण्याची देखील परंपरा आहे. अर्थात् हे स्वतःची प्रकृती सांभाळून करणे इष्ट राहील.

## अधिकमास किती महिन्यांनी येतो?

अधिकमास असलेल्या कालावधीत एका वर्षात दोन अयने होतात, सहा ऋतू होतात आणि बारा चांद्रमास होतात. प्रत्येक चांद्रमासात रवीची संक्रांत असते. त्यावरून चांद्रमासांची नावे पडली आहेत.

**मेषगे रवि संक्रांतिः शशीमासे भवति तत् चैत्रम् ।**
**एवं वैशाखाद्याः वृषादि संक्रांत योगेन॥**

ज्या चांद्रमासात मेष संक्रांत होते तो चैत्र महिना, वृषभ संक्रांत होते तो वैशाख याप्रमाणे बारा महिने होतात. चांद्रमास २९ पूर्णांक १/४ दिवसांचा असतो आणि चांद्रवर्ष ३५४ दिवसांचे असते. ज्या चांद्रमासात रवीची संक्रांत होत नाही तो अधिक महिना. त्यास पुढील महिन्याचे नाव असते. अधिक महिना साधारण साडेबत्तीस महिन्यांनी येतो. सूर्याभोवती पृथ्वीच्या एका भ्रमणास ३६५ पूर्णांक १/४ दिवस लागतात. अश्विनी नक्षत्राच्या विशिष्ट ताऱ्यापासून निघून त्याच ताऱ्यापर्यंत सूर्य येण्यास ३६५-१/४ दिवसांचा काळ लागतो. ते सौरवर्ष होय. सौरवर्ष व चांद्रवर्ष यात दरवर्षी ११ पूर्णांक १/४ दिवसांचे अंतर पडते. ते अधिक महिन्याने पुनः पूर्ववत होते. अशा रीतीने सौरवर्ष व चांद्रवर्ष यांचा आपल्या पंचांगात मेळ घातलेला आहे. तो धार्मिक कृत्यास पोषक आहे.

# अधिकमास झाला सुरू; यंदा 'ज्येष्ठ' महिना दोनदा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू पंचांगानुसार २०२६ हे वर्ष (विक्रम संवत २०८३) अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण ठरत आहे. या वर्षात नेहमीप्रमाणे १२ महिने नसून एकूण १३ महिने आहेत. यंदा 'ज्येष्ठ' महिना दोनदा आला असून, या वाढीव महिन्यालाच आपण 'अधिकमास' किंवा 'पुरुषोत्तममास' म्हणून ओळखतो. या अतिरिक्त महिन्यामुळे २०२६ मधील सण-उत्सवांच्या तारखांमध्येही मोठे बदल पाहायला मिळणार आहेत.

### अधिकमास सुरू

हिंदू पंचांगानुसार ज्येष्ठ महिना अधिकमास म्हणून गणला जाईल. याची सुरूवात रविवार, दि. १७ मे पासून होऊन सांगता १५ जून २०२६ रोजी होईल. यामुळे त्यानंतर येणारे मुख्य सण साधारण १५ ते २० दिवस पुढे ढकलले गेले आहेत. उदा.- रक्षाबंधन २८ ऑगस्टला, तर दीपावली ८ नोव्हेंबर २०२६ ला साजरी केली जाईल.

### का येतो अधिकमास?

अधिकमास येण्यामागे खगोलशास्त्रीय आणि गणिती कारण आहे. सूर्य वर्ष आणि चंद्र वर्ष यांच्यातील तफावत भरून काढण्यासाठी ही पद्धत वापरली जाते. सौर वर्ष साधारण ३६५ दिवसांचे असते तर चंद्र वर्ष सुमारे ३५४ दिवसांचे असते. या दोन वर्षांमध्ये दरवर्षी सुमारे ११ दिवसांचा फरक पडतो. हा फरक साचत जाऊन तीन वर्षांत साधारण ३२ ते ३३ दिवसांचा होतो. हा काळ संतुलित करण्यासाठी दर तीन वर्षांनी पंचांगात एक जास्तीचा महिना जोडला जातो. ज्याला 'अधिकमास' म्हणतात.

### काय करावे आणि काय टाळावे?

शुभ फलप्राप्तीसाठी हे करा

अधिकमासाचे अधिपती भगवान विष्णू आहेत. म्हणून याला 'पुरुषोत्तममास' असेही म्हणतात. भगवान विष्णूंची उपासना आणि मंत्रजाप करणे आणि दानधर्माला या महिन्यात



अनन्यसाधारण महत्त्व आहे. विशेषतः गरजूंना अन्नदान करणे पुण्यदायी मानले जाते. श्रीमद्भगवद्गीतेच वाचन किंवा श्रवण करणे लाभदायक ठरते.

### ही कामे टाळावीत

शास्त्रानुसार अधिकमासात 'काम्य' कर्मे म्हणजेच वैयक्तिक सुखासाठी केली जाणारी मंगल कार्ये वर्ज्य मानली जातात. विवाह, मुंज, गृहप्रवेश आणि नामकरण यांसारखे मोठे सोहळे या काळात करू नयेत. नवीन व्यवसाय किंवा मोठ्या गुंतवणुकीची सुरुवात करणे टाळावे. तामसी आहार (मांसाहार, मद्यपान) टाळून सात्विक जीवनशैलीचे पालन करावे. अशी मान्यता आहे, की अधिकमासात केलेली भक्ती आणि साधना इतर महिन्यांच्या तुलनेत अनेक पटीने अधिक फळ देते. यामुळे जीवनात सुख, शांती आणि समृद्धी लाभते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

# पुरुषसूक्त की विष्णुसहस्रनाम?

## अधिकमासात कोणते स्तोत्र ऐकणे ठरेल अधिक लाभदायी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रविवार, दि. १७ मे ते १५ जून २०२६ या काळात 'अधिक ज्येष्ठ मास' आहे. हिंदू धर्मात या महिन्याला 'पुरुषोत्तम मास' म्हटले जाते आणि हा संपूर्ण महिना भगवान विष्णूंच्या सेवेसाठी अत्यंत फलदायी मानला जातो. या पवित्र महिन्यात नामस्मरण, दान आणि स्तोत्र पठणाला हजार पटीने अधिक फळ मिळते. अशा वेळी अनेक भाविकांच्या मनात प्रश्न पडतो, की अधिकमासात रोज नेमके कोणते स्तोत्र ऐकणे अधिक प्रभावी ठरेल-पुरुषसूक्त की विष्णुसहस्रनाम? या दोन्ही स्तोत्रांचे आध्यात्मिक महत्त्व, त्यांचे लाभ आणि या काळात त्यांचे श्रवण कसे करावे, यावर आधारित हा सविस्तर लेख.

अधिक मासाचा स्वामी स्वतः भगवान विष्णू (पुरुषोत्तम) आहेत. त्यामुळे या काळात विष्णूंची स्तोत्रे ऐकणे म्हणजे साक्षात ब्रह्मांडीय उर्जेशी जोडले जाण्यासारखे आहे. चला तर दोन्ही स्तोत्रांचे महात्म्य समजावून घेऊ.

### १) पुरुषसूक्त

'पुरुषसूक्त' हे ऋग्वेदातील अत्यंत प्राचीन आणि शक्तिशाली सूक्त आहे. यामध्ये विश्वाची निर्मिती करणाऱ्या 'विराट पुरुषाचे' (परमेश्वराचे) वर्णन केले आहे.

महत्त्वः हे केवळ एक स्तोत्र नसून एक वैदिक मंत्रसमूह आहे. जेव्हा तुम्ही पुरुषसूक्त ऐकता, तेव्हा त्यातील



उच्चारांमुळे घरात आणि शरीरात तीव्र सकारात्मक कंपने निर्माण होतात.

### श्रवणाने मिळणारे लाभ

मानसिक शांतता आणि तेजः या सूक्ताच्या श्रवणाने मनातील नकारात्मक विचार दूर होऊन चित्त शुद्ध होते. पापांतून मुक्तीः ज्ञानात किंवा अज्ञानात झालेल्या चुकांचे निवारण करण्यासाठी पुरुषसूक्त ऐकणे श्रेष्ठ मानले जाते. वास्तू दोष निवारणः घरातील नकारात्मक ऊर्जा किंवा वास्तू दोष दूर करण्यासाठी सकाळी पुरुषसूक्त ऐकणे अत्यंत प्रभावी ठरते.

### २) विष्णुसहस्रनाम

महाभारताच्या अनुशासन पर्वात पितामह भीष्मांनी युधिष्ठिराला विष्णूच्या १००० नामांचा (विष्णुसहस्रनाम) महिमा सांगितला आहे. अधिक मासाला 'पुरुषोत्तम मास' म्हणतात आणि या स्तोत्रात विष्णूंच्या 'पुरुषोत्तम' रूपाचे वारंवार वर्णन येते.

महत्त्व : कलियुगात विष्णूची १००० नामे ऐकणे किंवा म्हणणे हे सर्व संकटांवर रामबाण उपाय मानले गेले आहे. हे अत्यंत सुलभ आणि व्यावहारिक स्तोत्र आहे.

### श्रवणाने मिळणारे लाभ

आर्थिक समृद्धी आणि बरकत : अधिक मासात रोज विष्णुसहस्रनाम ऐकल्याने घरात दरिद्रता राहत नाही आणि माता लक्ष्मीची अखंड कृपा लाभते.

ग्रहदोषांपासून मुक्ती : जर कुंडलीत शनीची साडेसाती, राहु-केतुचे दोष किंवा गुरू ग्रह कमकुवत असेल, तर विष्णुसहस्रनाम ते सर्व दोष शांत करते.

आरोग्य लाभ : दीर्घ आजारपणातून मुक्ती मिळवण्यासाठी आणि मानसिक ताणतणाव कमी करण्यासाठी याचे श्रवण अत्यंत प्रभावी ठरते.

### दोन्हींपैकी कोणते स्तोत्र ऐकणे ठरेल जास्त प्रभावी?

तसे पाहिले तर दोन्ही स्तोत्रे विष्णूंचीच आहेत आणि दोन्हींचे फळ अफाट आहे. परंतु, अधिक मासाच्या (पुरुषोत्तम मासाच्या) व्यावहारिक आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास 'विष्णुसहस्रनाम' ऐकणे किंवा म्हणणे जास्त प्रभावी आणि सुलभ मानले जाते. कारणः

अधिक मासाचे महात्म्य सांगणाऱ्या ग्रंथांमध्ये या महिन्यात भगवान विष्णूच्या नामस्मरणाला सर्वोच्च स्थान दिले आहे. विष्णुसहस्रनामात विष्णूंची १००० नावे एकत्र येतात.

सामान्य लोकांसाठी किंवा ऑफिसच्या गडबडीत पुरुषसूक्ताचे कठीण वैदिक उच्चार करणे किंवा समजणे अवघड जाऊ शकते, परंतु विष्णुसहस्रनाम ऐकणे आणि त्याशी जोडले जाणे अत्यंत सोपे आहे.

सुवर्ण मध्य : जर तुमच्याकडे वेळ असेल, तर सकाळी कामाला सुरूवात करताना 'पुरुषसूक्त' लावावे. ज्यामुळे घरातील ऊर्जा शुद्ध होईल आणि दुपारी किंवा सायंकाळी कामातून ब्रेक घेताना किंवा घरी येताना 'विष्णुसहस्रनाम' ऐकावे.

# सूर्याला कोट्यवधी लोक अर्घ्य अर्पण करतात, लाखो जण विसरतात

## पण फळ मात्र काही मोजकेच मिळवितात!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रोज सकाळी आपण पाहिले असेल की कोणी गच्चीवर उभे आहे, तांब्याच्या कलशातून पाण्याची धार पडत आहे, डोळे मिटलेले आहेत आणि ओठांवर 'ॐ सूर्याय नमः' असा जप आहे. शेजारच्या काकू बादलीनेच पाणी ओततात, तर कोणी ऑफिसला जाता-जाता पाण्याच्या बाटलीनेच शिंतोडे उडवतो. सर्वांचा भाव एकच सूर्यदेवाला नमन. पण प्रत्येकाला मिळणारे परिणाम वेगळे का? कारण सूर्याला जल अर्पण करणे ही केवळ परंपरा नाही, तर ते एक विज्ञान आहे. आपल्या ऋषीमुनींनी याला केवळ पूजा मानले नाही, तर 'ऊर्जा-व्यवस्थापन' म्हटले आहे. योग्य वेळ, योग्य दिशा, योग्य धातू आणि योग्य भाव या चार गोष्टी जुळून आल्या, की तो एक तांब्या पाणी तुमची झोप, मन, कार्य आणि नशीब या चारी गोष्टी बदलून टाकते.
या पोस्टमध्ये आपण ही संपूर्ण विधी, कथा आणि नियम समजून घेऊया.

### १) सूर्यच का? कोट्यवधी लोक नतमस्तक का होतात?

वेद म्हणतात 'सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च' (सूर्य हा जगाचा आणि सर्व सजीवांचा आत्मा आहे). सूर्य म्हणजे केवळ आगीचा गोळा नाही, तर तो या सृष्टीचा प्राण आहे. ऋग्वेदाच्या पहिल्याच सूक्तामध्ये अग्नीनंतर सूर्याची स्तुती आहे. अथर्ववेद म्हणतो, जो सकाळी सूर्याचे दर्शन घेतो, त्याचे अर्धे आजार नष्ट होतात. महाभारतात कर्ण तासनतास सूर्योपासना करायचा, म्हणूनच त्याला अजेय कवच मिळाले. रामायणात प्रभू श्रीरामांना अगस्त्य ऋषींनी रावणवधापूर्वी 'आदित्य हृदय स्तोत्र' शिकवले होते.

आधुनिक विज्ञानही आता मान्य करते, की सकाळच्या पहिल्या कोवळ्या उन्हात यूव्ही-बी मुळे व्हिटॅमिन डी मिळते, निळ्या प्रकाशामुळे मेलाटोनिन कमी होऊन सेरोटोनिन वाढते. म्हणजेच मन प्रसन्न, हाडे मजबूत आणि झोप शांत लागते. आपल्या पूर्वजांनी याला धर्माशी जोडले, जेणेकरून सुशिक्षित असो वा अशिक्षित, प्रत्येकाने रोज हे 'औषध' घ्यावे.

### २) पाणीच का अर्पण करतात? पाण्यात काय आहे?

सूर्याला पाणी वाहण्याला 'अर्घ्य' म्हणतात. अर्घ्य म्हणजे मौल्यवान भेट. जेव्हा तुम्ही तांब्याच्या कलशातून पाण्याची बारीक धार सूर्याच्या दिशेने सोडता, तेव्हा पाण्याचे थेंब 'प्रिझम' (लोलक) बनतात. त्यातून सात रंग विखुरले जातात आणि ते थेट तुमच्या डोळ्यांवर, त्वचेवर आणि मेंदूवर पडतात. याला 'क्रोमोथेरपी' म्हणतात. तसेच, त्या धारेतून सूर्याकडे पाहिल्याने डोळ्यांच्या बाहुल्यांचे आकुंचन-प्रसरण होते. हे एक प्रकारचे 'त्राटक' आहे एकाग्रतेचा प्राचीन योग. तांबे पाण्यात सूक्ष्म आयन सोडते, जे शरीरातील जीवाणू मारण्यास आणि कॉपर बॅलन्स राखण्यास मदत करतात. म्हणून लोटा नेहमी तांब्याचाच असावा, स्टील किंवा प्लास्टिकचा नाही.

### ३) योग्य वेळ घड्याळ नाही, आकाश पाहा!



सर्वांत मोठी चूक वेळेची होते. लोक ८-९ वाजता, आरामात आंघोळ करून पाणी चढवतात. तोपर्यंत सूर्याचे तेज प्रखर झालेले असते.

शास्त्र सांगते, सूर्योदयाच्या एक तासाच्या आत, जेव्हा सूर्य लाल-नारंगी असतो आणि किरणे कोमल असतात, तेव्हाच अर्घ्य द्यावे. याला 'प्रातः संध्या' म्हणतात. ब्रह्ममुहूर्तावर (४ ते ६ दरम्यान) उठणे उत्तम, पण अर्घ्य सूर्य उगवताच द्यावे. हिवाळ्यात साधारण ६:४५ आणि उन्हाळ्यात ५:२० हीच 'अमृत बेला' आहे.

### ४) तयारी- तीन शुद्धी

तन शुद्धी : स्नान करावे. शक्य नसल्यास हात-पाय-तोंड धुवावे. ओले कपडे घालू नयेत.
पात्र शुद्धी : तांब्याचा लोटा रात्रभर पाण्याने भरून ठेवावा. सकाळी तेच पाणी वापरावे. लोट्यात अक्षता, कुंकू आणि लाल फुले (जास्वंद किंवा कणेर) टाकावीत. दूध किंवा मध अर्घ्यात टाकू नका, ते तर्पणासाठी असते.
मन शुद्धी : पूर्वेकडे तोंड करून उभे राहा. पायताण काढा. 'आजचा दिवस प्रकाशमय होवो' हा एकच संकल्प मनात ठेवा.

### ५) योग्य विधीसाठी सात टप्पे

१) दोन्ही हातांनी लोटा नाभीजवळ पकडा.
२) सूर्याकडे पहा, हळूहळू लोटा डोक्याच्या वर उचला.
३) पाण्याची धार इतकी पातळ ठेवा की ती तुटणार नाही, एक सलग रेघ बनेल.
४) त्या धारेच्या मधून सूर्याकडे पहा. ५-७ सेकंद त्राटक करा.
५) या काळात मंत्र म्हणा. सर्वात सोपा 'ॐ घृणि सूर्याय नमः' (११ वेळा) किंवा एकदा गायत्री मंत्र.
६) पाणी पायावर पडू देऊ नका. ते एखाद्या झाडात किंवा तुळशीत पडेल असे पहा. उरलेले पाणी डोळ्यांना आणि कपाळाला लावा.
७) स्वतःभोवती तीनदा प्रदक्षिणा घाला आणि दोन्ही तळवे घासून डोळ्यांवर ठेवा.
हे सर्व करायला २ मिनिटांपेक्षा जास्त वेळ लागत नाही.

### ६) महत्त्वाचे नियम

दिशा : नेहमी पूर्व दिशा. उगवत्या सूर्यालाच अर्घ्य द्यावे, मावळत्याला नाही.
उंची : लोटा छातीपेक्षा वर धरावा, जेणेकरून धार तुमच्या 'आज्ञा चक्रा' समोरून जाईल.
वस्त्र : लाल, भगवे किंवा पांढरे सुती कपडे उत्तम. काळे कपडे टाळा.
नियमितता : सलग २१ दिवस हे करा, तुमच्या शरीराचे 'बायोलॉजिकल क्लॉक' सेट होईल.

### ७) सामान्य चुका

प्लास्टिकच्या बाटलीने पाणी देणे ऊर्जा मिळत नाही. सूर्याकडे पाठ करून जल अर्पण करणे हा अपमान मानला जातो. पाणी नालीत वाहून जाणे ऊर्जा व्यर्थ जाते.

### ८) एक छोटी कथा- कर्णाची सकाळ

महाभारतात कर्णाला 'सूतपुत्र' म्हणून हिणवले जायचे. तो रोज ब्रह्ममुहूर्तावर उठून गंगेकाठी जायचा, तांब्याच्या कलशातून सूर्याला अर्घ्य द्यायचा आणि तासभर जप करायचा. जेव्हा इंद्र त्याचे कवच-कुंडल मागण्यासाठी आले, तेव्हा कर्णाने नकार दिला नाही. तो म्हणाला, "सूर्याने मला रोज तेज दिले आहे, मी रिकाम्या हाताने कोणाला परत कसे पाठवू?" जोपर्यंत सूर्य आकाशात होता, तोपर्यंत कर्णाला कोणीही हरवू शकले नाही. ही कथा आपल्याला 'देण्याची शक्ती' शिकवते.

### ९) २१ दिवसांचा प्रयोग : स्वतः बदल अनुभवा

पहिले ३ दिवस : लवकर जाग येईल, आळस कमी होईल.
७ वा दिवस : डोळ्यांत चमक आणि त्वचा स्वच्छ दिसेल.
१४ वा दिवस : निर्णयक्षमता वाढेल, राग कमी होईल.
२१ वा दिवस : लोक म्हणतील, "चेहऱ्यावर तेज आले आहे!"
हे चमत्कार नाही, तर तुमचे हार्मोन्स रिसेट झाल्याचा परिणाम आहे.

### १०) अंतिम प्रार्थना

सूर्याला जल अर्पण करणे ही पूजा नाही, तर कृतज्ञता आहे. तो न मागता रोज उगवतो, वीजबिल न आकारता प्रकाश देतो. आपण फक्त एक तांब्या पाणी परत करतो. उद्यापासून अलार्मच्या १० मिनिटे आधी उठा, तांब्याचा लोटा भरा आणि त्या पहिल्या किरणाला पाण्याच्या धारेत पहा. मनात म्हणा "हे नारायणा माझ्या जीवनातील अंधकार दूर कर."
ही छोटीशी सवय तुम्हाला गर्दीपेक्षा वेगळे करेल. कारण यश मोठ्या उडीने नाही, तर रोजच्या सूर्योदयाने मिळते.

**ॐ सूर्याय नमः!**

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)